**कृपया प्रसिध्दीसाठी** **10 नोव्हेंबर 2008**

**भाजपा नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी 10 नोव्हेंबर 2008 रोजी नाशिक येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन**

**---------------------------**

***डिझेल, पेट्रोल आणि गॅसचे दर कमी करा - राम नाईक***

**नाशिक, सोमवार:** ''गेल्या सोळा वर्षात सर्वात जास्त वाढलेली महागाई आणि त्याचबरोबर देशात आलेली आर्थिक मंदी यामुळे सामान्य माणूस अक्षरशः भरडला जात असून त्याला जीवन जगणे असह्य झाले आहे. या परिस्थितीला पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांचे काँग्रेस आघाडीचे सरकारच जबाबदार आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाचे (क्रुड ऑईल) दर निम्म्यापेक्षा कमी झाल्यामुळे वाढत्या महागाईचे ओझे कमी करण्यासाठी पेट्रोल 5 रुपये प्रति लिटर, डिझेल 3 रुपये प्रति लिटर आणि स्वयंपाकाचा गॅस 50 रुपये प्रति सिलेंडर कमी करण्यात यावे'' अशी मागणी भाजपा नेते आणि माजी पेट्रोलियम मंत्री श्री राम नाईक यांनी नाशिक येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केली.

यासंबंधी सविस्तर बोलताना श्री राम नाईक म्हणाले, ''महागाईच्या दुष्टचक्राला पेट्रोल-डिझेल यांच्या किमंत वाढीमुळे अधिक गती प्राप्त होते. गेल्या चार वर्षात पेट्रोलियम क्षेत्रामध्ये सरकारचे धोरण दिशाहीन झाले आहे. जुलै 2008 मध्ये कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल 147 डॉलर होती, ती 6 नोव्हेंबर 2008 रोजी 56 डॉलर म्हणजेच निम्म्यापेक्षा अधिक खाली आली आहे. 'पेट्रोल-डिझेलच्या किंमती एका आठवड्यात कमी करु' अशी घोषणा 23 ऑक्टोबर 2008 रोजी लोकसभेत करुनही त्याबाबत सरकारने अद्याप निर्णय घेतलेला नाही. आम आदमीच्या नावावर निवडून आलेल्या या सरकारला सामान्य माणसाच्या अडीअडचणींची जाणीवच नाही. ऑगस्ट 2008 मध्ये विमानासाठी वापरण्यात येणाऱ्या इंधनाचा (एव्हीएशन टर्बाईन फ्युएल) दर 73.67 रुपये प्रति लिटर होता तो वेळोवेळी कमी करुन 5 नोव्हेंबर 2008 रोजी 42.98 रुपये प्रति लिटर म्हणजेच 30.69 रुपये प्रति लिटर (42 टक्के) कमी करण्यात आला आहे. सामान्य माणसाला लागणाऱ्या पेट्रोल-डिझेल-गॅसचे दर कमी होत नाहीत, परंतु श्रीमंतांसाठी लागणाऱ्या विमानाच्या इंधनाचा दर कमी होतो हे धक्कादायक आहे. मोटारीचे पेट्रोल 55.07 रुपये प्रति लिटर तर विमानाचे पेट्रोल त्यापेक्षा स्वस्त म्हणजे 42.98 रुपये प्रति लिटर हे अर्थशास्त्र फक्त पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंहच समजू शकतात.''

''भरीस भर म्हणून स्वयंपाकाचा गॅस आणि शिधावाटप पत्रिकेवर मिळणारे केरोसिन यांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून सर्वत्र अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत काळ्याबाजाराचे थैमान चालू आहे. महिलांना शांतचित्ताने स्वयंपाक करणेही अवघड झाले असून कुटुंबातील स्वास्थ्यावरही त्याचा परिणाम होत आहे. पंतप्रधान वाजपेयी यांच्या काळात स्वयंपाकाच्या गॅसची 1 कोटी 10 लाख ग्राहकांची प्रतिक्षा सूचि संपवून जवळजवळ 4 कोटी नव्या जोडण्या देण्यात येऊन महिलांचे सशक्तीकरण करण्यात आले होते. मागेल त्याला सिलेंडर ताबडतोब मिळत होता. त्या तुलनेत आजची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली आहे,'' असेही श्री. नाईक म्हणाले.

''पूरक इंधन म्हणून इथेनॉलचे उत्पादन करण्यास वाजपेयी यांच्या काळात प्रथमच प्रारंभ झाला होता. 2003 मध्ये उसाचे अधिक उत्पादन असलेल्या 9 राज्यांमध्ये पेट्रोलमध्ये 5 टक्के इथेनॉल मिसळण्याचे बंधनकारक केले होते. 2004 साली उरलेल्या राज्यांमध्ये 5 टक्के तर 2005 मध्ये संपूर्ण देशात 10 टक्के इथेनॉल मिसळण्याचा निर्णय झाला होता. परंतु शेतकऱ्यांच्या आणि देशाच्या हिताचा हा निर्णय अंमलात न आणता लिकर लॉबीच्या दबावाला बळी पडून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांच्या सरकारने 2004 पासून इथेनॉल खरेदी करणेच बंद केले. इथेनॉल खरेदीला पुन्हा सुरुवात करणार असल्याचे सूतोवाच नुकतेच पेट्रोलियम

..2..

मंत्रालयाच्या सुत्रांनी केले. परंतु देशाच्या दृष्टीने महत्वाची 4 वर्षे वाया गेली. केंद्र सरकारमध्ये महाराष्ट्रातून श्री. शरद पवार, कृषि, अन्न व ग्राहक संरक्षण मंत्री आणि श्री. मुरली देवरा पेट्रोलियम मंत्री असताना असे घडावे हे दुर्दैवाचेच नव्हे तर संतापजनकही आहे. 2007-08 या आर्थिक वर्षात परदेशातून 2,72,699 कोटी रुपयांचे कच्चे तेल आयात करण्यात आले. जर 10 टक्के इथेनॉल मिश्रणाचा कार्यक्रम चालू राहिला असता तर कोट्यावधि रुपयांचे परदेशी चलन वाचले असते आणि पर्यायाने उस उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळून ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारली असती,'' असे प्रतिपादन श्री. नाईक यांनी केले.

''याशिवाय जत्रोपा, करंज, पोंगमिया आदि अखाद्य तेल बियांपासून जैविक इंधन (बायोफ्युएल) निर्माण करण्याचा यशस्वी प्रयोग वाजपेयी सरकारच्या काळात होऊन जत्रोपाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्याचा निर्णय झाला होता. तथापि पंतप्रधान मनमोहन सिंह यांच्या सरकारने या कामातही अक्षम्य दिरंगाई केली. जैविक इंधनाचे राष्ट्रीय धोरण ठरविण्यासाठी कृषिमंत्री श्री. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रिय मंत्रीमंडळाचा अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. संबंधित अभ्यासगटाने 4 वर्षांचा कालावधि गेल्यानंतर जो अहवाल तयार केला तो अहवाल नुकताच 3 नोव्हेंबर 2008 रोजी झालेल्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजूर न होता पुनर्विचारासाठी परत पाठविण्यात आला. म्हणजेच हे सरकार साडेचार वर्षांच्या काळात जैविक इंधना संबंधीचे धोरण ठरविण्यातही अपयशी ठरले, अंमलबजावणी तर दूरच राहिली,'' असे श्री. नाईक म्हणाले.

''घाऊक बाजाराच्या किंमतींच्या आधारे काढण्यात येणारा महागाईचा निर्देशांक 4 ऑक्टोबर 2008 रोजी संपलेल्या आठवडयात 11.44 टक्के वाढला. गेल्या 16 वर्षात सप्टेंबर 2008 मध्ये झालेली वाढ ही विक्रमी आहे. याशिवाय अर्थमंत्री डॉ. पी. चिदंबरम यांनी 2008-09 चा अर्थसंकल्प सादर करताना राष्ट्रीय विकासाचा दर (जीडीपी) कमीतकमी 2 आकड्यांत म्हणजेच 10 टक्क्यांपेक्षा जास्त राहील अशी घोषणा केली होती. ही घोषणा स्वप्नरंजन ठरली आहे. राष्ट्रीय विकासाचा दर कमी झाला असून तो 7.7 टक्के राहील असे रिझर्व्ह बँकेनेच 23 ऑक्टोबर 2008 रोजी जाहीर केले आहे. याचाच अर्थ देशामध्ये आर्थिक मंदी आली आहे असा होतो. एका बाजूने वाढती महागाई आणि दुसऱ्या बाजूने मंदी यांच्यामध्ये सामान्य माणूस अक्षरशः भरडला जात असून पेट्रोल प्रति लिटर 5 रुपये, डिझेल प्रति लिटर 3 रुपये आणि स्वयंपाकाचा गॅस प्रति सिलेंडर 50 रुपयांनी ताबडतोब कमी केले नाही तर जनता आगामी काळात कॉंग्रेसला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही,'' असेही श्री राम नाईक शेवटी म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**

**विशेष : महागाई वाढीचे तुलनात्मक पत्रक सोबत जोडले आहे.**

# भारतीय जनता पार्टी

*काँग्रेसचा हात, महागाईची साथ*

*जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमती*

**(किंमती मुंबईच्या दुकानातील आहेत - संकलक : श्री.राम नाईक)**

| वस्तू | भाजपा सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु.) मे 2004 | काँग्रेस सरकारच्या काळातील दर (प्रति किलो रु) नोव्हेंबर 2008 | वाढ (%टक्के) |
|---|---|---|---|
| गहू | 9 | 20 | 122% |
| तांदूळ | 10 | 22 | 120% |
| साखर | 14 | 21 | 50% |
| चहा पावडर | 80 | 160 | 100% |
| खाद्य तेल | 40 (प्रति लिटर) | 78 (प्रति लिटर) | 95% |
| डालडा | 40 | 60 | 50% |
| मुग डाळ | 24 | 50 | 108% |
| मसूर डाळ | 22 | 68 | 209% |
| चणा डाळ | 25 | 42 | 68% |
| गूळ | 14 | 34 | 143% |
| बेसन | 20 | 48 | 140% |
| बटाटा | 8 | 12 | 50% |
| कांदा | 6 | 16 | 167% |
| टोमॅटो | 9 | 30 | 233% |
| दूध | 14 (प्रति लिटर) | 28 (प्रति लिटर) | 100% |
| केरोसीन | 18 (प्रति लिटर) | 35 (प्रति लिटर) | 94% |
| स्वयंपाकाचा गॅस | 244 (प्रति सिलेंडर) | 334 (प्रति सिलेंडर) | 37% |
| पेट्रोल | 33.15 (प्रति लिटर) | 55.07(प्रति लिटर) | 66% |
| डिझेल | 22.50 (प्रति लिटर) | 38.40 (प्रति लिटर) | 71% |

मुंबईचा ग्राहक मूल्य निर्देशांक (Consumer Price Index) श्री.अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात मे 2004 मध्ये 428 होता, तो डॉ.मनमोहन सिंह यांच्या काँग्रेस सरकारच्या कारकिर्दीत वाढून जून 2005 मध्ये 442 झाला, मग जून 2006 मध्ये तो 468 पर्यंत वाढला. जून 2007 मध्ये त्याने 496 वर उडी घेतली आणि मार्च 2008 ला तर तो 528 वर पोचला. ही निर्देशांकात झालेली वाढ 23 टक्के आहे. त्यानंतर एप्रिल 2008 पासून ग्राहक मूल्य निर्देशांक प्रसिद्ध करण्याचेच सरकारने बंद केले. दुसरीकडे घाऊक बाजारातील किंमतींच्या आधारे काढण्यात येणारा महागाई निर्देशांक 4 ऑक्टोबर 2008 रोजी संपलेल्या आठवडयात 11.44 टक्के वाढला. **गेल्या 16 वर्षात ही झालेली वाढ विक्रमी आहे.** या शिवाय अर्थमंत्री डॉ.पी.चिदंबरम् यांनी 2008-09 चा अर्थसंकल्प सादर करतांना राष्ट्रीय विकासाचा दर (जीडीपी) कमीत कमी दोन आकड्यात म्हणजेच 10 टक्क्यापेक्षा जास्त राहील अशी घोषणा केली होती. राष्ट्रीय विकासाचा दर कमी झाला असून तो 7.9 टक्के आहे असे भारत सरकारनेच 29 ऑगस्ट 2008 रोजी जाहीर केले आहे. **याचाच अर्थ देशामध्ये मंदीची सुरुवात झाली आहे असा होतो.** एका बाजूने वाढती महागाई आणि दुस-या बाजूने मंदी यांच्यामध्ये सामान्य माणूस अक्षरशः भरडला जात आहे. या परिस्थितीत दरवाढीचे ओझे सामान्य नागरिक कसे पेलणार ?

***भाजपा सरकार कसे होते आणि आताचे काँग्रेस सरकार कसे आहे ? तुम्हीच विचार करा !***